बीड । गुरूवार
०६.०३.२०२५
वर्षे : ४ अंक : ३२७
किंमत : ३ रू. पाने : ४

दैनिक ● www.marathwadapatra.com

मराठवाडा पत्र

■ संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे ■

dailymarathwadapatra2021@gmail.com RNI:Reg.NO.MAH/MAR/2021/80074 Post:Reg.No.L/226/RNP/Renewal/2025-2027 Mob:9822152955

गरम तळपत्या सळईनी कातडी सोलल्या

जालनामध्ये अत्याचाराने गाठली परिसीमा, Video आला समोर

मंदिरामध्ये गेल्यामुळे तरुणाला गरम चटके देऊन अत्याचार करण्यात आला आहे (फोटो - सोशल मीडिया)

जालना । प्रतिनिधी

राज्यामध्ये अत्याचाराच्या रोज नवीन घटना समोर येत आहेत. डिसेंबर महिन्यामध्ये झालेल्या संतोष देशमुख यांच्या हत्येचे प्रकरण ताजे असताना आणखी एक व्हिडिओ समोर आला आहे.

मस्साजोग गावाचे सरपंच संतोष देशमुख यांचे अपहरण करुन निर्घृणपणे हत्या करण्यात आली. याचे धक्कादायक असे फोटो देखील समोर आले असून यामुळे राज्यभरामध्ये रोष व्यक्त केला आहे. याचप्रमाणे आता जालनाम धील अंगावर काटा आणणारा व्हिडिओ समोर आला आहे.

शरद पवार गटाचे नेते व आमदार जितेंद्र आव्हाड यांनी हा व्हिडिओ शेअर केला आहे. हा व्हिडिओ जालनामधील असल्याचा दावा केला जातो आहे. यामध्ये एका तरुणावरुन काही लोकांकडून अमानूष

अत्याचार होत असल्याचे दिसत आहे. कैलास बोराडे असे या तरुणाचे नाव असल्याचे समोर येत

▶▶ उर्वरित पान २ वर

त्या आरोपींवर मकोका लावणार ? उपमुख्यमंत्र्यांकडून मोठं पाऊल

एका तरुणाला विवस्त्र करुन त्याच्या गुप्तांगासह शरीरावर लोखंडी रॉडने चटके दिल्याच्या भयंकर घटनेने जालना जिल्हा हादरला आहे. भोकरदनम धील या घटनेत कैलास बोराडे नावाचा तरुण गंभीर जखमी झाला आहे. काही दिवसांपूर्वी घडलेल्या या घटनेचे पडसाद आज अधिवेशनातही पाहायला मिळाले. उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्याकडून या अमानुष मारहाणीची दखल घेण्यात आली असून या घटनेतील गुन्हेगारांना पाठीशी न घालता त्यांच्यावर 'मकोका' लावण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याशी चर्चा करून निर्णय घेण्यात येईल, असे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी आज विधान परिषदेत सांगितले.

बीडमध्ये चाललंय काय !

देशमुखांच्या हत्येनंतर सुरेश धसांच्या माणसाने एकाला बॅटीने केली मारहाण ?

बीड । प्रतिनिधी

बीड जिल्ह्यातील मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांची अत्यंत अमानुषपणे हत्या करण्यात आली. या हत्येचे व्हिडिओ आणि फोटो समोर आल्यानंतर महाराष्ट्र हादरला आहे. नागरिकांमध्ये संतापाची लाट निर्माण झाली आहे. हे प्रकरण ताजे असतानाच आता सोशल मीडियावर बीडमधलीच आणखी एक घटना समोर आली आहे. यात काही गुंड एका व्यक्तीला बॅटीने बेदम मारहाण करत असल्याचे दिसून येत आहे. या घटनेमुळे आता बीडमधील दहशत कधी संपणार की नाही, असा सवाल केला जात आहे.मिळालेल्या माहितीनुसार,

सोशल मीडियावर व्हायरल होत असलेल्या व्हिडिओमध्ये पांढरा शर्ट घातलेला व्यक्ती हा एका व्यक्तीला बॅटीने बेदम मारहाण करताना दिसते. तसेच एकजण त्या व्यक्तीच्या हाता पायाला धरून असल्याचे दिसते. यावेळी आणखी काही लोक आजूबाजूला असल्याचे समजते. मारहाण करणाऱ्या व्यक्तीचे नाव सतिश भोसले असल्याचे समजते. दरम्यान, पीडित व्यक्तीचे नाव अद्याप समजू शकले नाही. मात्र अत्यंत क्रूरपणे या व्यक्तीला म

▶▶ उर्वरित पान २ वर

अत्याचाराचा प्रयत्न करत महिलेवर केले धारदार चाकूने वार

महिलेचा चेहराही केला विद्रूप, १९ वर्षीय विकृत अटकेत

छ.संभाजीनगर । प्रतिनिधी

बलात्काराचा केल्यानंतर प्रयत्न ३६ वर्षीय विवाहितेने आरडाओरडा सुरू केल्याने विकृताने तिच्या अभिषेक नवपुते संपूर्ण शरीरावर धारदार चाकूने वार केले. तिचा चेहराही विद्रूप करत हत्येचा प्रयत्न केला. रविवारी सायंकाळी ही धक्कादायक घटना घडली. अभिषेक तात्याराव नवपुते (१९, रा. घारदोन) असे विकृताचे नाव असून, चिकलठाणा पोलिसांनी त्याला मंगळवारी अटक केली.

अभिषेक नवपुते

अनेक दिवसांपासून अभिषेक त्या महिलेचा पाठलाग करीत होता. विवाहितेने त्याच्याकडे दुर्लक्ष केले. २ मार्च रोजी विवाहिता सायंकाळी शेतात काम करीत होती. अभिषेकने शेतात जावून ७ तिचा गळा दाबला व तिच्यावर अत्याचार करण्याचा प्रयत्न केला. विवाहितेने त्याला तीव्र विरोध केला. त्यामुळे अभिषेकने तिचा गळा पकडून तिला जमिनीवर आपटले. तिचा चेहरा, पोट, मान, हात डोक्यात चाकूने १५ पेक्षा अधिक वार केले. त्यानंतरही त्याने अत्याचाराचा प्रयत्न केला. मात्र, विवाहिता बेशुद्ध पडल्याने तिच्या डोक्यात दगड घालून ती मृत झाल्याचे समजून पसार झाला. शेताच्या दुसऱ्या टोकाला असलेली सासू घरी निघाल्यानंतर तिला शेताच्या रस्त्यात सून रक्तबंबाळ बेशुद्धावस्थेत आढळली. त्यानंतर कुटुंबाने तिला शहरात आणले. गजानन महाराज मंदिर परिसरातील एका रुग्णालयान

▶▶ उर्वरित पान २ वर

- शेतात लपून बसला- विवाहिता मृत झाल्याचे समजून अभिषेक निघून गेला. सोमवारी रात्री गुन्हा दाखल झाल्याचे कळताच तो गाव परिसरातील शेतात लपून बसला होता.
- अधीक्षक डॉ. विनयकुमार राठोड, उपअधीक्षक पूजा नांगरे यांनी कारवाईच्या सूचना केल्या.
- निरीक्षक रविकिरण दरवडे, उपनिरीक्षक सतीश पंडित यांनी शोध घेत त्याला शेतातून अटक केली.
- रक्तबंबाळ अवस्थेतही तो तिच्यावर अत्याचाराचा प्रयत्न करत होता. महिला बेशुद्ध पडली तेव्हा तिच्या डोक्यात दगड घालून तो पसार झाला.
- विकृताच्या चाकु हल्ल्यामुळे महिलेला ५२ टाके द्यावे लागले

गुन्हेगारीचा बादशाह बनण्याचं स्वप्न

टोळीचा बाप व्हायचं होतं, #३३३३ ब्रँड नेम ठरलं; सुदर्शनची खतरनाक गोष्ट

बीड । प्रतिनिधी

मस्साजोग चे सरपंच संतोष देशमुख यांची अपहरण करून ९ डिसेंबर रोजी हत्या करण्यात आली. यावेळी आरोपींनी काळी स्कॉर्पिओ वापरून काळे कारणामे केले होते. याच काळात रंगाच्या गाडीमध्ये १९ महत्त्वाचे पुरावे आढळून आले आहेत.

ही गाडी सुदर्शन घुले याच्या नावावर होती चक ४४न९३३३ असा नंबर आहे. त्यामुळे आरोपींना शिक्षा करण्यासाठी गाडी महत्त्वाची ठरणार आहोत. विशेष संतोष देशमुख हत्या प्रकरणात सर्वच आरोपींनी व्हीआयपी गाड्या वापरल्याचा आरोप हे धनंजय देशमुख यांनी केला आहे....

सुदर्शन घुले याला गुन्हेगारीचा ब्रँड करायचा होता म्हणून ३३३३ वापरला. एवढेच नाही तर रील करून तो दहशत निम र्ण करायचा प्रयत्न करत होता असा आरोप हे धनंजय देशमुख यांनी केला आहे. सुदर्शन घुले याच्या गाडीमध्ये सापडलेले १९ पुरावे त्यातील महत्वाचे पुरावे आहे.

काळ्या चारचाकी गाडीमध्ये सापडले १९ महत्त्वाचे पुरावे, सीआयडीच्या तपासात आरोपी सुदर्शन घुलेची काळ्या रंगाची स्कार्पिओ गाडी ठरली महत्त्वाची, आरोपींनी वापरलेले तीन मोबाईल सापडले व्हिडिओ आढळून आला, काळ्या काचाचे दोन गॉगल्स, सुदर्शन घुलेचे मारहाण करतानाचे काळ्या रंगाचे जॅकेटही स्कार्पिओ गाडीत सापडले. सहा आरसी बुक सापडले, सुदर्शन घुलचे, एटीएम कार्ड, रिपि कार्ड, लोखंडी पाईप ज्याला क्लच वायर बसवून तयार केलेले हत्यार, रक्ताचा डाग असलेला सीट कव्हर तुकडा

आरोपींच्या राक्षसी कृत्यामुळे समाज माध्यमावर प्रचंड रोष

मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांना कराड गँगकडून अमानुष मारहाण करण्यात आली. अंगावरील कपडे काढून झालेल्या या मारहाणीचे फोटो सीआयडीच्या चार्जशीटमधून समोर आले आहेत. हे फोटो पाहून कोणाचंही काळीज पिळवटून जाईल असे हे फोटो आहेत. हत्या करणाऱ्यांनी अमानुषतेचा कळस कसा गाठला आणि देशमुख यांची कशी हालहाल करून हत्या केली याचा फोटोनंतर आणखी सर्वात मोठा पुरावा समोर आलाय.

धनंजय मुंडेंचा राजीनामा होताच अजित पवार संतापले, वाल्मीकचं नाव घेत पदाधिकाऱ्यांचे टोचले कान

मुंबई । प्रतिनिधी

मागील काही दिवसांपासून महाराष्ट्रात संतोष देशमुख यांचं हत्या प्रकरण गाजत आहे. अलीकडेच सोशल मीडियावर संतोष देशमुख यांच्या खूनाचे फोटो व्हायरल झाले. यानंतर राज्यभर तीव्र संताप व्यक्त करण्यात आला. या सगळ्या घडामोडींनतर अजित पवार गटाचे मंत्री धनंजय मुंडे यांना राजीनामा द्यावा लागला आहे. धनंजय मुंडे यांच्या राजीनाम्यानंतर उपमुख्यमंत्री आणि पक्षाचे प्रमुख अजित पवार यांनी आपल्या पदाधिकाऱ्यांचे कान टोचले आहेत. मंगळवारी धनंजय मुंडे यांचा राजीनामा झाल्यानंतर अजित पवारांनी रात्री उशिरा देवगिरी बंगल्यावर कार्यकर्ते आणि

▶▶ उर्वरित पान २ वर

आंतराष्ट्रीय महिला दिनाची सुरुवात नेमकी कशी झाली? यंदाची थीम काय ? जाणून घ्या इतिहास

८ मार्च हा आंतरराष्ट्रीय महिला दिन म्हणून साजरा केला जातो. जगभरातले लोक याच तारखेला महिला दिन का साजरा करतात यामागे एक महत्त्वाचं कारण आहे. महिला दिनाच्या या परंपरेला महिलांच्या चळवळीचा, आंदोलनांचा मोठा इतिहास आहे. या सगळ्याची सुरुवात १९ व्या शतकात अमेरिकेमध्ये झाली. १९०८ साली अमेरिकेत न्यूयॉर्कमध्ये एक भव्य मोर्चा निघाला होता. हा महिलांनी महिलांसाठी काढलेला मोर्चा होता. आपल्या कामाचे तास कमी करा, अशी त्यांची प्रमुख मागणी होती.

आपल्याला चांगलं वेतन मिळावं आणि मतदानाचा अधिकार मिळावा याही मागण्या घेऊन या महिला रस्त्यावर उतरल्या होत्या. सुमारे १५ हजार महिलांनी या मोर्चात भाग घेतला. या आंदोलनामुळे महिलांचा आवाज साऱ्या जगासमोर आला. त्याची दखल राजकीय पक्षांनाही घ्यावी लागली. यानंतर वर्षभराने सोशलिस्ट पक्षाने ८ मार्च हा राष्ट्रीय महिला दिवस म्हणून घोषित केला. अमेरिकेमध्ये ८ मार्च हा दिवस महिला दिन म्हणून साजरा झाला. नंतर जगभरामध्ये महिला दिनाचा हा आवाज घुमू लागला.

क्लारा जेटकिन यांची संकल्पना

१९१० मध्ये कोपनहेगन इथे झालेल्या एका आंतरराष्ट्रीय परिषदेत क्लारा जेटकिन या द्रष्ट्या महिलेने महिला दिनाची संकल्पना मांडली. क्लारा जेटकिन या महिलांच्या अधिकारांसाठी लढणाऱ्या कम्युनिस्ट कार्यकर्त्या होत्या. या परिषदेत जमलेल्या १७ देशांच्या प्रतिनिधींनी क्लारा जेटकिन यांच्या प्रस्तावाला अनुमोदन दिलं. त्यानंतर १९११ साली ऑस्ट्रिया, डेन्मार्क, जर्मनी, स्वित्झर्लंड या देशांमध्ये महिला दिन साजरा करण्यात आला.

१९७५ साली अधिकृत मान्यता

अमेरिकेनंतर अशा प्रकारे युरोपमध्येही महिला दिन साजरा होऊ लागला पण त्याला अधिकृत मान्यता मिळाली १९७५ साली. संयुक्त राष्ट्रांनी १९७५ साली आंतरराष्ट्रीय महिला दिनाला मान्यता दिली. या महिला दिनाची थीमही ठरवण्यात आली. Celebrating the past planning for the future अशी ही पहिली थीम होती. 'भूतकाळ साजरा करतानाच भविष्यासाठीची योजना करुया' हा संकल्प यानिमित्ताने करण्यात आला.

रशियामध्ये महिलांचं आंदोलन

आंतरराष्ट्रीय महिला दिनाचा आणखी एक इतिहास आहे. रशियामध्ये १९१७ साली महिलांनी 'भाकरी आणि शांतता' अशा दोन मागण्यांसाठी आंदोलन केलं. महिलांच्या या कामबंद आंदोलनाने सम्राट निकोलसला पद सोडायला भाग पाडलं. एवढंच नव्हे तर त्यानंतर आलेल्या सरकारला महिलांना मतदानाचा अधिकारही द्यावा लागला. महिलांच्या या आंदोलनाची आठवण म्हणून ८ मार्च हा आंतराष्ट्रीय महिला दिन म्हणून साजरा होऊ लागला.

देशातील या १० महिलांनी प्रथम सर्वोच्च पदांवर पोहोचून रचला इतिहास

आज पुरुषांसोबत खांद्याला खांदा लावून चालण्यास काम करण्यास कधीही मागेपुढे पाहिले नाही. महिलांनी मोठ्या पदांवर मोठ्या अभिमानाने जबाबदारी घेतली आहे. आज आपण अश्याच महिलांबद्दल जाणून घेणार आहोत, ज्यांनी देशात पहिल्यांदाच एखाद्या पदावर विराजमान होऊन इतिहास रचला आहे.

१. इंदिरा गांधी

देशाच्या राजकारणात एक खास ओळख निर्माण करणाऱ्या इंदिरा गांधी या देशाच्या पहिल्या पंतप्रधान होत्या. इंदिरा गांधी या १९६६ मध्ये देशाच्या पहिल्या महिला पंतप्रधान बनल्या. इंदिरा गांधी यांनी त्यांच्या राजकीय आयुष्यात तीन वेळा पंतप्रधानपद भूषवले. त्यांच्या कार्यकाळात त्यांनी मोठे राजकीय निर्णय घेतले. त्यांच्या निर्णयाची अनेकदा भारतीय राजकारणात चर्चा होते.

२. प्रतिभा पाटील

प्रतिभा देवीसिंह पाटील या भारताच्या १२ व्या राष्ट्रपती होत्या. त्यांनी इ.स. २००७ ते इ.स. २०१२ मध्ये राष्ट्रपतीपदाची जबाबदारी सांभाळली होती. भारताच्या राष्ट्रपतीपदावर नेमल्या गेलेल्या त्या पहिल्या महिला होत्या. त्यांनी आपला कार्यकाळ अतिशय चांगल्या आणि धैर्याने हाताळला आहे.

३. मीरा कुमार

काँग्रेसचे दिवंगत नेते जगजीवन राम यांच्या कन्या मीरा कुमार या देशाच्या पहिल्या महिला सभापती आहेत. मीरा कुमार यांनी २००९ सासाराम मतदारसंघातून विजयी झाल्या. त्यावेळी मीरा कुमार यांची यांची लोकसभेच्या अध्यक्षपदी निवड झाली. त्या देशातील पहिल्या महिला सभापती बनल्या आहेत.

४. राजकुमारी अमृत कौर

राजकुमारी अमृत कौर या स्वतंत्र देशाच्या पहिल्या महिला कॅबिनेट मंत्री बनल्या होत्या. जवाहरलाल नेहरूंच्या नेतृत्वाखाली स्थापन झालेल्या पहिल्या मंत्रिमंडळात त्यांचा कॅबिनेट मंत्री म्हणून समावेश करण्यात आला.

५. सुचेता कृपलानी

सुचेता कृपलानी यांनी १९६३ मध्ये उत्तर प्रदेश राज्याचे मुख्यमंत्रीपद भूषवलं आहे. त्या देशातील पहिल्या मुख्यमंत्री म्हणून त्यांनी उत्तर प्रदेश सारख्या महत्वाच्या राज्यचा कारभार सांभाळला आहे. १९६३-६७ पर्यंत उत्तर प्रदेश सरकारच्या प्रमुख म्हणून काम करणाऱ्या त्या भारताच्या पहिल्या महिला मुख्यमंत्री होत्या.

६. सरोजिनी नायडू

सरोजिनी नायडू या एक राजकीय कार्यकर्त्या आणि कवयित्री होत्या. देशाच्या पहिल्या महिला राज्यपाल सरोजिनी नायडू यांनी राज्यपाल पद भूषवलं आहे. १९४७ ते १९४९ पर्यंत त्या उत्तर प्रदेशच्या राज्यपाल होत्या. नायडूंच्या कवितेत लहान मुलांच्या कविता आणि देशभक्ती यासह अधिक गंभीर विषयांवर लिहिलेल्या दोन्ही कवितांचा समावेश आहे. १९१२ मध्ये प्रकाशित, इन द बाजार्स ऑफ हैदराबाद ही त्यांची सर्वात लोकप्रिय कविता आहे.

७. फातिमा बीबी

फातिमा बीवी या इ.स. १९८९ मध्ये भारताच्या पहिल्या महिला न्यायाधीश आहेत. भारतातून एवढ्या मोठ्या पोस्टवर जाणाऱ्या त्या पहिल्या महिला होत्या. फातिमा बीवी यांचे पूर्ण नाव मीरा साहिब फातिमा बीवी असे आहे. त्यांचा जन्म ३० एप्रिल १९२७ रोजी केरळ मधल्या पतनमतिट्टा या गावात झाला.

८. अण्णा राजम मल्होत्रा

देशाला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर अण्णा राजम मल्होत्रा या पहिल्या महिला आयएएस अधिकारी होत्या. अण्णा राजम यांचा जन्म १९२७ मध्ये केरळमधील एरनाकुलम येथे झाला. १९९५ मध्ये त्यांनी नागरी सेवांसाठी जाण्याचा निर्णय घेतला. १९५१ मध्ये त्यांनी एक मुलाखत दिली ज्यामध्ये तिची निवड झाली.

९. किरण बेदी

किरण बेदी यांना देशातील पहिल्या आयपीएस अधिकारी म्हणून ओळखले जाते. किरण बेदी या भारतातील पहिल्या आयपीएस अधिकारी आहेत. मसूरी येथील राष्ट्रीय अकादमीमध्ये पोलीस ट्रेनिंगमध्ये ८० पुरुष तुकडीतील त्या एकमेव महिला होत्या. किरण बेदी यांची पोलीस अधिकारी म्हणून पहिली नेमणूक दिल्लीच्या चाणक्यपुरीत झाली. १९९४ मध्ये त्यांना रॅमन मॅगसेसे पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

१०. सरला ठकराल

सरला ठकराल या विमान उडवणा-या पहिल्या भारतीय महिला आहेत. १९३६ साली त्यांनी म्हणजेच २१ व्या वर्षी दिल्लीतील फ्लाइंग क्लबमधून विमान चालवण्याचे प्रशिक्षण घेतले व विमानचालकाचे लायसन्स मिळवले. त्यानंतर त्यांनी एक जिप्सी मोथ जातीचे विमान सोलो उडवले.

पान १ वरून पुढे...

गरम तळपत्या...

आहे. तळपत्या सळईचे चटके हे पीडित तरुणाला दिले जात आहे. तरुणाच्या उघड्या अंगावर हे जळत्या सळईचे चटके दिले जात आहेत. तापलेल्या रॉडने कैलासच्या पायाला, पोटाला, पाठीला, मानेवर, गळ्याजवळ, दंडावर, डाव्या तळहातावरचटके देत संशयितांनी जीवे मारण्याच्या प्रयत्न केला. जालन्याचे पोलिस प्रशासनाने या घटनेची दखल घेतली असून आरोपीला अटक झाली आहे. तसेच आरोपीवर ३०७ चा गुन्हा दाखल केला आहे. मात्र या घटनांमुळे माणसांमधील माणूसकी हरवली असल्याचे पुन्हा एकदा दिसून येत आहे. महाराष्ट्रामध्ये होत असलेल्या या गंभीर घटनांमुळे राज्यामध्ये कायदा व सुव्यवस्था आहे की नाही असा प्रश्न निर्माण होत आहे. हा व्हिडिओ जितेंद्र आव्हाड यांनी देखील सोशल मीडियावर शेअर केला आहे.

जितेंद्र आव्हाड यांनी व्हिडिओ शेअर करताना लिहिले आहे की, संतोष देशमुख यांच्या हत्येने क्रौर्याची परिसीमा गाठल्याचे सबंध महाराष्ट्राने पाहिलेले असतानाच आता लातूरच्या जानेफळ गावात महाशिवरात्रीच्या दिवशी कैलास बो-हाडे या तरूणाची कातडी सोलल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. लोखंडाच्या तप्त सळईने त्याच्या शरीरावर

पान १ वरून पुढे...

डागण्या देण्यात आल्या ; कारण काय तर तो मंदिरात गेला !

गेल्या महिनाभरापूर्वी लातूरमध्येच माऊली सोट यालाही अशाच पद्धतीने संपविण्यात आले होते. शिव, फुले, शाहू, आंबेडकरांचा महाराष्ट्र म्हणून आपण स्वतःची पाठ थोपटून घेत असताना एका गोरगरीब मागासवर्गीय समाजातील तरुणाची केवळ मंदिरात प्रवेश केला म्हणून गरम सळईचे चटके देऊन पाठ सोलली जात असेल अन् त्याची कातडी सोलली जात असेल तर आपणाला खरंच शिव, फुले, शाहू, आंबेडकरांचे नाव घेण्याचा अधिकार आहे का ? कालच मी संतोष देशमुखचे फोटो आधीच सरकारकडे असल्याचे नमूद करून सरकारचा उल्लेख निर्दयी असा केला होता. आता महाशिवरात्रीच्या दिवशी घडलेल्या घटनेची साधी वाच्यताही केली जात नसेल तर मी उल्लेख केलेला निर्दयी हा शब्द किती योग्य आहे, याची प्रचिती येते. केवळ मंदिरात प्रवेश केला म्हणून जर असे हालहाल करून मारले जात असेल तर या गोरगरीब, दलित समाजातील तरूणांनी कायदा हातात घेतला तर त्यास फक्त हे सरकार जबाबदार असेल! असा घणाघात आमदार जितेंद्र आव्हाड यांनी केला आहे.

बीडमध्ये चाललंय...

मारहाण केल्याचे दिसून येत आहे.

पान १ वरून पुढे...

अंजली दमानियांनी व्हिडिओ ट्विट करत केला आरोप ?

यावर सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांनी जोरदार टीका केली आहे. गृहमंत्र्यांनी आणि सुरेश धस यांनी उत्तर द्यावे, असे म्हणत या मारहाणीचा व्हिडिओ शेअर करत अंजली दमानिया यांनी प्रश्न उपस्थित केला आहे. अद्याप शिरूर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल झाला नसल्याचे त्यांनी म्हटले आहे.

सतिश भोसले या गुंडाने काही दिवसांपूर्वी बावी गावातल्या एका व्यक्तीला असेच मारहाण केले होते. या मारहाणीत पीडित व्यक्तीचे सगळे दात पडल्याचे समजते. या प्रकरणी अद्याप कोणतीही कारवाई झाल्याची माहिती समोर आलेली नाही. मात्र, बीडमध्ये नेमके काय चालू आहे ? असा प्रश्न आता सर्वसामान्य जनतेला पडला आहे. बीडमधील गुन्हेगारी पाहता सामान्य नागरिकांना आपल्याच शहरात आता सुरक्षित वाटत नसल्याच्या भावना समोर येत आहेत.

अत्याचाराचा प्रयत्न...

दाखल करून घेण्यास नकार दिल्याने दुसऱ्या खासगी रुग्णालयात दाखल केले. सोमवारी रात्री शुद्धीवर आल्यावर तिने पोलिसांना सर्व प्रकार सांगितला. त्यानंतर अभिषेकवर गुन्हा दाखल करण्यात आला. तिच्या

पान १ वरून पुढे...

शरीरावर तब्बल ५२ टाके पडल्याचे पोलिसांनी सांगितले.

धनंजय मुंडेंचा...

पदाधिकाऱ्यांची बैठक घेतली. या बैठकीत त्यांनी धनंजय मुंडे यांचं उदाहरण देत, परावलंबी न होता स्वावलंबी बना, या प्रकरणातून धडा घ्या. कार्यकर्त्यांवर फार विसंबून राहू नका, अशा शब्दांत अजित पवारांनी कानउघडणी केल्याचं माहिती समोर आली आहे.

नेत्यांसोबत कार्यकर्ते व्यवस्थित नसतील तर त्याची झळ नेत्यासोबत पक्षाला देखील कशा प्रकारे बसते, हे मुंडे प्रकरणातून दिसून आलं, असं उदाहरण देखील अजित पवारांनी बैठकीत दिल्याचं सांगितलं जातं. आगामी स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीत आपल्या आजूबाजूला कोणते कार्यकर्ते आहेत, याची माहिती घ्या. पूर्णपणे कार्यकर्त्यांच्या जीवावर राजकारण नको परावलंबी न होता स्वावलंबी व्हा, असा कानमंत्र अजित पवारांनी कार्यकर्त्यांना दिला.

तसेच धनंजय मुंडे पूर्णपणे वाल्मीक कराडवर अवलंबून होते. त्याचा फटका मुंडेंना आणि पक्षाला बसला, अशाप्रकारे अजित पवारांकडून कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करण्यात आलं आहे.

पान ४ वरून पुढे...

सरपंच/ सदस्य...

यांचे आदेश रद्द करण्यास शासनास भाग पाडावे अशी विनंती प्रा.ईश्वर मुंडे, महाराष्ट्र राज्य प्रमुख, सेवा निवृत्त अधिकारी सेल, राष्ट्रवादी कॉंग्रेस शरदचंद्र पवार पक्ष यांनी मुंबई येथे आ.जयंत पाटील, प्रदेशाध्यक्ष, राष्ट्रवादी कॉंग्रेस शरदचंद्र पवार पक्ष, महाराष्ट्र राज्य यांना प्रत्यक्ष भेटून लेखी निवेदनाद्वारे केली आहे.

अनुसूचित जाती...

ठिकाणी निवासी प्रशिक्षण कार्यक्रमाची व्यवस्था करण्यात आली असून सदरील प्रशिक्षण कार्यक्रमांमध्ये सहभागी होणाऱ्या लाभार्थींचे मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम योजनेअंतर्गत कर्ज प्रस्ताव तयार करण्यात येणार आहेत. सदरील प्रशिक्षण कार्यक्रमांमध्ये बीड जिल्ह्यातून २० लाभार्थींची प्रत्यक्ष मुलाखती द्वारे निवड करून सदरील प्रशिक्षणासाठी पाठवण्यात येणार आहे.तसेच तांत्रिक उद्योजकता विकास प्रशिक्षण कार्यक्रमांतर्गत १) सीएनसी मशीननिंग(अनुसूचित जाती प्रवर्ग) २)डीडी प्रिंटिंग अँड रिव्हर्स इंजीनियरिंग(अनुसूचित जाती प्रवर्ग)३) फूड अँड प्रोसेसिंग (अनुसूचित जमाती प्रवर्ग)४)सोलर पीव्ही टेक्निशियन(अनुसूचित जमाती प्रवर्ग) इत्यादी टेक्निकल प्रशिक्षण कोर्स आयोजित करण्यात आले असून सदरील प्रशिक्षण कार्यक्रम हा दिनांक १७ मार्च २०२५ ते ३० एप्रिल २०२५ या कालावधी दरम्यान महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्र मुख्य कार्यालय छत्रपती संभाजीनगर या ठिकाणी ४५ दिवस निवासी प्रशिक्षण देण्यात येणार आहे. त्यामध्ये संपूर्ण तांत्रिक मार्गदर्शनासह उद्योजकीय मार्गदर्शन करण्यात येणार आहे सदरील प्रशिक्षणासाठी बीड जिल्ह्यातून प्रत्येक प्रशिक्षणासाठी ५ लाभार्थी याप्रमाणे २० लाभार्थी प्रत्यक्ष मुलाखती द्वारे निवड करून प्रशिक्षणासाठी छत्रपती संभाजीनगर येथे पाठवण्यात येणार आहेत. या प्रशिक्षण कार्यक्रमांमधून

पान ४ वरून पुढे...

एसटी अनुसूचित जमाती प्रवर्गातील तांत्रिक प्रशिक्षण १० व उद्योजकता विकास प्रशिक्षण १० लाभार्थीसे एकूण २० लाभार्थींची निवड करून पाठवण्यात येणार असून (एस सी)अनुसूचित जाती प्रवर्गातील तांत्रिक प्रशिक्षण १० लाभार्थी व उद्योजकता विकास प्रशिक्षण १० असे एकूण २० लाभार्थींची निवड करून छत्रपती संभाजीनगर येथे प्रशिक्षणासाठी पाठवण्यात येणार आहेत. सदरील प्रशिक्षण कार्यक्रमाच्या माध्यमातून जिल्ह्यातील होतकरू तरुण-तरुणींना प्रशिक्षणाद्वारे उद्योगाच्या क्षेत्रामध्ये स्वतःचे करिअर करण्यासाठी संधी मिळणार आहे. निवासी उद्योजकता विकास प्रशिक्षण कार्यक्रमाचे प्रवेश अर्ज भरण्याची अंतिम दिनांक ७ मार्च २०२५ असून त्याच दिवशी दुपारी २ ते ५ या वेळेमध्ये प्रत्यक्ष मुलाखती द्वारे लाभार्थ्यांची निवड करण्यात येणार आहे. तसेच तांत्रिक उद्योजकता विकास प्रशिक्षण कार्यक्रमाच्या प्रवेश अर्ज भरण्याची अंतिम तारीख १२ मार्च २०२५ असून त्याच दिवशी दुपारी २ ते ५ या वेळेमध्ये प्रवेश अर्ज भरलेल्या लाभार्थींची प्रत्यक्ष मुलाखती द्वारे जिल्हा उद्योग केंद्र संचेती बिल्डिंग गुडलक हॉटेल च्या बाजूला जालना रोड बीड या ठिकाणी निवड करण्यात येणार आहे. वरील प्रशिक्षण कार्यक्रमाचा बीड जिल्ह्यातील बेरोजगार होतकरू तरुण युवक युवतींनी लाभ घ्यावा असे आवाहन जिल्हा उद्योग केंद्राचे महाव्यवस्थापक किरण जाधव बीड व श्री दत्तात्रय क्षीरसागर प्रकल्प अधिकारी महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्र द्वारा जिल्हा उद्योग केंद्र बीड तसेच सुदाम थोटे विभागीय अधिकारी महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्र छत्रपती संभाजी नगर यांनी केले आहे.

मराठा सेवा ...

नियुक्तीपत्र देऊन स्वागत करण्यात आले. सूत्रसंचालन युवराज हिरवे यांनी केले आभार विष्णू यादव यांनी मानले. यावेळी विष्णू आबा तपसे बाळासाहेब सोनवणे, मनोज भोसले तालुकाध्यक्ष जयराम देशमुख ,अभय देशमुख, उत्तरेश्वर भोसले, संजय तपसे, यांच्यासह पदाधिकारी उपस्थित होते.

पान ४ वरून पुढे...

चिंचोटी रस्त्यावरील...

तालुकाध्यक्ष विनोद काकडे यांनी निवेदनाद्वारे केले आहे.

याबाबत वंचित बहुजन युवा आघाडीचे वडवणी तालुका अध्यक्ष विनोद काकडे यांनी वडवणी तहसीलदारांना दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की वडवणी ते चिंचोटी हा रस्ता तात्काळ दुरुस्त करावा अशी मागणी मी अनेक वेळा केली होती कारण या रस्त्यावर भारतातील एकमेव तीर्थक्षेत्र राजा हरिश्चंद्राचे मंदिर आहे. या मंदिरात दरवर्षीप्रमाणे याही वर्षी महाशिवरात्र महोत्सव गेल्या आठवड्याभरात पार पडला. लाखो भाविकांना या तीर्थक्षेत्रावर जाताना मोठा त्रास सहन करावा लागला. खड्ड्यामध्ये अनेक वेळा अपघात होऊन भाविक जखमी झाले. लोकांना एवढा मोठा त्रास झाल्याबद्दल आनंद व्यक्त करण्यासाठी आणि प्रशासनाचे अभिनंदन करण्यासाठी या रस्त्यावर जागरण गोंधळाचा भव्य दिव्य कार्यक्रम आयोजित केला आहे. शुक्रवार दिनांक ७ मार्च रोजी सकाळी साडेदहा वाजता जागरण गोंधळाचे भव्य दिव्य नियोजन केले आहे. या कार्यक्रमासाठी वडवणी तालुक्यातील अनेक वाटसरूही उपस्थित राहणार आहेत तरी वडवणीचे तहसीलदार तसेच बांधकाम विभागाचे वडवणी, बीड येथील कार्यालयातील कर्तव्यदक्ष अधिकारी यांनी या ठिकाणी कार्यक्रमाला उपस्थित राहावे आणि रस्त्यावरील खड्ड्यातील कार्यक्रमाचा लाभ घ्यावा असे आवाहन विनोद काकडे यांनी तहसीलदारांना दिलेल्या निवेदनातून केले आहे.

बीड पंचायत....

विविध उपक्रम राबविले गेले. महात्मा गांधींच्या स्वप्नातील खेडी ही स्वयंपूर्ण ,स्वयंशासित असावीत अशी सर्व ग्रामस्थांची अपेक्षा असते शासनाच्या विविध योजना उपक्रम व सेवा ग्रामस्थांच्या

पान ४ वरून पुढे...

दारी पोहोचवणे हे सुप्रशासनाचे लक्षण आहे. याच मुद्यावर आधारित ग्रामीण भागात काम करणाऱ्या सर्व विभागांच्या अधिकाऱ्यांमार्फत प्रत्येक गावामध्ये विविध सेवा ठराविक कालावधीत पोहचविण्याच्या अनुषंगाने 'एक दिवस गावक-यांसोबत (ग्राम दरबार)हा नाविन्यपूर्ण उपक्रम छत्रपती संभाजी नगर विभागात राबविण्यात येत आहे. त्या अनुषंगाने जिल्हा परिषद बीड व बीड पंचायत समिती आणि ग्राम पंचायत कार्यालय लिंबागणेश यांच्या संयुक्त विद्यमाने 'एक दिवस गावकऱ्यांसोबत' हा ग्राम दरबार उपक्रम राबवण्यात आला. विविध विभागातील आधिका-यांनी उपस्थित राहून ग्रामस्थांशी संवाद साधला. तसेच त्यांच्या अडीअडचणी जाणून घेतल्या. पंचायत समिती अंतर्गत व शासनाच्या सर्व कल्याणकारी योजनांचा नागरिकांनी लाभ घ्यावा असे आवाहन जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी जिल्हा परिषद बीड डॉ.विजय देशमुख यांनी केले. शासनाच्या विविध विकास योजनेविषयी पंचायत समितीमध्ये सर्व उपक्रम यांनी मार्गदर्शन मार्गदर्शन केले. शासनाच्या विविध योजना, उपक्रम, धोरण आणि सेवा ग्रामस्थांच्या दारी पोचवण्याचा उद्देशाने या लोकोपयोगी उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. याप्रसंगी ग्रामपंचायत, शिक्षण ,कृषी, महिला व बालकल्याण ,आरोग्य पशुसंवर्धन, समाज कल्याण, पाणीपुरवठा ,स्वच्छता ,सिंचन व जलसंधारण या संदर्भातील अडचणींवर सविस्तर चर्चा केली. तसेच यावर तोडगा काढण्यासाठी कटिबद्ध असल्याचे त्यांनी सांगितले.

चिंचोटी येथे...

व मारेकर्यांना फाशीची शिक्षा झालीच पाहीजे,धनंजय यांचा आमदारकीचा राजीनामा घेण्यात यावा आशा घोषणा देत निषेध करण्यात आला.या वेळी गावातील सर्व समाज बांधव तरुण युवकांसह सर्व लहान थोर उपस्थित होते.

Daily Marathwada Patra Owner, Printer, published and Editor Dattatray Sakharam Narnale has Printed in Gugladevi, Printers Subhash Road, Malives, Kabad Galli, Beed (Rural) City, Beed Beed 431122 (Maharashtra). Office of Dainik Marathwada Patra Subhash road, Malives, Kabad Galli, Beed Tq- Beed Dist- Beed pin 431122 (Maharashtra) Mo. 9822152955, E-mail- dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

हे पत्र प्रकाशक मुद्रक व मालक दत्तात्रय सखाराम नरनाळे यांनी गुगळादेवी प्रिंटर्स, सुभाष रोड, माळीवेस, कबाड गल्ली, बीड, ता.जि. बीड - ४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक मराठवाडा पत्र सुभाष रोड, माळीवेस, कबाडगल्ली, बीड ता. जि. बीड - ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. मोबा. ९८२२१५२९५५ संपादक - दत्तात्रय सखाराम नरनाळे, E-mail-marathwadapatra@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

वडवणी तालुक्यात खळवट लिमगाव येथे आकाशातून पडले दगड

अंतराळ विज्ञान केंद्राने घेतले ताब्यात

वडवणी । प्रतिनिधी

तालुक्यातील खळवट लिमगाव येथे आकाशातून दोन रहस्यमय दगड पडल्याची घटना समोर आली आहे. या दगडांपैकी एक शेतकऱ्याच्या घरावर पडला असून, दुसरा घराच्या शेजारील मोकळ्या जागेत आढळला आहे. विशेष म्हणजे, हे दगड एपीजे अब्दुल कलाम अंतराळ विज्ञान केंद्राच्या अभ्यासकांनी ताब्यात घेतले असून, त्यांचे संशोधन सुरू आहे. लिमगाव येथील शेतकरी भिकाजी ज्ञानोबा अंबुरे यांच्या घरावर सोमवारी दुपारी अचानक मोठा आवाज झाला. शेतकरी आणि ग्रामस्थांनी पाहणी केली असता, घराच्या पत्र्यावर मोठे छिद्र पडलेले आढळले. घराच्या आत शोध घेतल्यावर काळ्या रंगाचा, सुमारे पाव किलो वजनाचा दगड आढळून आला. त्याच वेळी, घराशेजारील गायरान जागेत देखील तसाच आणखी एक दगड आढळून आला. या घटनेमुळे गावकऱ्यांमध्ये मोठे कुतूहल निर्माण झाले असून, हे दगड खरोखर आकाशातून पडले आहेत का? ते उल्कापिंड आहेत का? याबाबत चर्चा रंगली आहे.

या घटनेची माहिती मिळताच, ग्रामपंचायत व तहसील प्रशासनाने घटनास्थळी भेट दिली. अधिकाऱ्यांनी दगडांचा पंचनामा करून ते ताब्यात घेतले. त्यानंतर, छत्रपती संभाजीनगर येथील एपीजे अब्दुल कलाम अंतराळ विज्ञान केंद्राच्या अभ्यासकांनी गावाला भेट देऊन दोन्ही दगड ताब्यात घेतले. लवकरच या दगडांबाबत अधिकृत निष्कर्ष जाहीर केला जाणार आहे. या रहस्यमय घटनेमुळे लिमगाव आणि परिसरातील नागरिकांमध्ये मोठी उत्सुकता निर्माण झाली आहे.

थोडक्यात

तामिळनाडू येथे झालेल्या टेनिस बॉल क्रिकेटच्या राष्ट्रीय स्पर्धेमध्ये महाराष्ट्र संघाने सुवर्ण पदक पटकावले

जिल्हा क्रीडा अधिकाऱ्यांच्या हस्ते खेळाडूंचा सत्कार

बीड । प्रतिनिधी

नुकत्याच तामिळनाडू येथे टेनिस बॉल क्रिकेटच्या फेडरेशन कम राष्ट्रीय स्पर्धा संपन्न झाल्या. या राष्ट्रीय स्पर्धा टेनिस बॉल क्रिकेट फ ेडरेशन ऑफ इंडिया व तामिळनाडू टेनिस बॉल क्रिकेट असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने घेण्यात आल्या होत्या. या राष्ट्रीय स्पर्धेम ध्ये महाराष्ट्र संघाने सुवर्ण पदक पटकावले. या महाराष्ट्र संघा मध्ये बीड येथील सहा खेळाडूंचा सहभाग होता. त्यामध्ये माऊली ढवळे, विशाल गिरी, रोहित ढवळे, संकेत वायकर, गणेश शिंदे, समर्थ शेळके या खेळाडूंनी तामिळ येथे झालेल्या राष्ट्रीय स्पर्धेमध्ये महाराष्ट्राला पदक मिळवण्यासाठी मोलाची कामगिरी केली. या यशाबद्दल जिल्हा क्रीडा अधिकारी अरविंद विद्यागर, उपशिक्षण अधिकारी हजारे सर, डॉ. अविनाश बारगजे, प्रा.गोपाळ धांडे , संतोष जाधव, बीड जिल्हा टेनिस बॉल क्रिकेट असोसिएशनचे सचिव रामदास गिरी, क्रीडा मार्गदर्शक रेवननाथ शेलार, नितीन कोंडेकर, वाळुंजकर, यांच्या उपस्थितीमध्ये राष्ट्रीय खेळाडूंचा सत्कार करण्यात आला व पुढील स्पर्धेसाठी हार्दिक शुभेच्छा दिल्या.

जयभिम महोत्सव समितीकडून चेक सुपूर्द सत्कार: समितीकडून पैशाचा योग्य विनियोग

बीड । प्रतिनिधी

अवघ्या राज्याला आदर्श निर्माण करुन देईल. असा जयभिम महोत्सव बीडमध्ये साजरा केला जातो. स्वबळावर साजरा होणारा जयभिम महोत्सव म्हणून नावारूपाला आला आहे. त्या अनुषंगाने डॉ. बाबासाहेब आंबेडकर सार्वजनिक जयंती उत्सव समितीचे प्रमुख असताना शिल्लक राहिलेले सहा लाख रुपये राष्ट्रीयकृत बँकेत फिक्स डिपॉझिट म्हणून ठेवण्यात आले होते. त्या रकमेसह मिळालेले व्याज असे एकूण ८ लाख ५० हजार रुपये बुद्धशृष्टी शुशोभिकरण समितीकडे सुपूर्द करण्यात आले आहेत. बीड शहरातील रिपाइं मध्यवर्ती कार्यालयात, युवा रिपाइं प्रदेशाध्यक्ष पप्पू कागदे यांच्या उपस्थितीमध्ये बुद्धशृष्टी शुशोभिकरण समितीकडे सदरील रकमेचा चेक सुपूर्द करण्यात आला आहे. डॉ.बाबासाहेब आंबेडकर सार्वजनिक जयंती समिती तत्कालीन समिती प्रमुख असलेले शितलकुमार सुकाळे यांनी त्यांच्या कार्यकाळात शिल्लक राहिलेले सहा लाख रुपये राष्ट्रीयकृत बँकेत फिक्स डिपॉझिट म्हणून जमा करुन ठेवले होते. सर्वानुमते शिल्लक रकमेचा उपयोग बुद्धसृष्टी सुशोभीकरणासाठी खर्च करण्याचे ठरले. त्या अनुषंगाने शितलकुमार सुकाळे सर यांनी फिक्स डिपॉझिटचे सहा लाख आणि त्यावरील व्याज यासह आठ लाख पन्नास हजार रुपये समितीकडे सुपूर्त केले. शितलकुमार सुकाळे सर यांनी शिल्लक रक्कम व्यवस्थित जतन केल्यामुळे आणि रकमेचा विनियोग करण्याचा निर्णय घेताच तात्काळ ८५०००/- चा चेक समितीकडे सुपूर्त केल्याबद्दल शितलकुमार सुकाळे सर यांचा सहृदय सत्कार करण्यात आला.यावेळी राजुजी जोगदंड अजयजी सवाई गौतम चोपडे संतोष जाधव नाना मस्के अरुणा आठवले बंडू निसर्गन विजय चोपडे बाळासाहेब डोळस महादेव इनकर सर,संजय हनवते आदी उपस्थित होते.

राज्यात कामगारांसाठी 'नाका शेड' ची उभारणी करणार: कामगार मंत्री ॲड. आकाश फुंडकर

मुंबई । प्रतिनिधी

राज्यात मोठ्या शहरांप्रमाणेच छोट्या शहरांमध्ये नाक्यांवर कामगार मोठ्या प्रमाणावर असतात. नाक्यावर थांबून आपल्या कामासाठी जाणाऱ्या कामगारांना बसण्यासाठी शेडची आवश्यकता असते. अशा ठिकाणी जागेची उपलब्धता तपासून नाका शेडची उभारणी करण्यात येईल, अशी माहिती कामगार मंत्री ॲड. आकाश फुंडकर यांनी विधानसभेत प्रश्नोत्तराच्या तासात दिली. बांधकाम कामगारांच्या मागण्यांबाबत सदस्य सत्यजित देशमुख यांच्या प्रश्नाला कामगार मंत्री फुंडकर यांनी उत्तर दिले. या प्रश्नाच्या चर्चेत सदस्य भास्कर जाधव,अमित देशमुख, राम कदम, विकास ठाकरे, योगेश सागर, अतुल भातखळकर यांनी सहभाग घेतला. राज्य शासनामार्फत बांधकाम कामगारांसाठी राबविण्यात येणाऱ्या योजनांच्या माध्यमातून त्यांचे जीवनमान अधिक सुकर करण्यासाठी या योजना अधिक गतिमान पद्धतीने राबविण्यात येणार असल्याचे सांगत कामगार मंत्री फुंडकर णाले, बांधकाम कामगारांची नोंदणी जलदगतीने होण्यासाठी प्रत्येक तालुक्यात सेतू केंद्रावर व्यवस्था करण्यात आली आहे. या ठिकाणी बांधकाम कामगाराच्या कागदपत्रांची केवळ पडताळणी करण्यात येते. सध्या मंडळाकडून ३२ विविध प्रकारच्या कल्याणकारी योजनांची अंमलबजावणी करण्यात येत आहे. या योजनांपासून कोणताही पात्र लाभार्थी वंचित राहणार नाही, याची काळजी शासन घेत आहे. बांधकाम कामगारांना सामाजिक सुरक्षा प्रदान करण्यावर विशेष भर दिला जात आहे. बांधकाम कामगारांच्या मृत्यू, अपघात आणि विमा लाभांसाठी तातडीने कार्यवाही करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. यामुळे अशा लाभांची प्रक्रिया एका महिन्यात पूर्ण होईल आणि संबंधित कुटुंबियांना आर्थिक मदत वेळेत मिळेल.

डिजिटल मीडिया परिषदेच्या बीड तालुकाध्यक्षपदी अभिजीत पवार यांची निवड

कार्याध्यक्ष लक्ष्मण गायकवाड, तर उपाध्यक्षपदी दीपक वाघमारे सचिवपदी शेख समद यांची वर्णी

बीड । प्रतिनिधी

मराठी पत्रकार परिषदेची संलग्न असलेल्या डिजिटल मीडिया परिषदेचे जिल्हाध्यक्ष दिनकर शिंदे यांनी बीड तालुकाध्यक्षपदी अभिजीत पवार, कार्याध्यक्ष लक्ष्मण गायकवाड, उपाध्यक्षपदी दीपक वाघमारे तर सचिवपदी शेख समद यांची निवड जाहीर केली आहे. प्रिंट मीडिया सोबतच डिजिटल मीडियाला अनन्य साधारण महत्त्व प्राप्त झाल्याने, या पुढील काळात प्रत्येक घटना आणि माहिती तात्काळ वाचक आणि प्रेक्षकांपर्यंत प्रभावीपणे पोहोचवण्यासाठी आणि त्यासोबतच डिजिटल मीडियाम ध्ये काम करणाऱ्या प्रत्येक पत्रकारांच्या हितासाठी, मराठी पत्रकार परिषदेचे मुख्य विश्वस्त एस एम देशमुख यांनी डिजिटल मीडिया परिषद स्थापन केली आहे. त्यांच्याच नेतृत्वाखाली आणि डिजिटल मीडिया परिषदेचे राज्याध्यक्ष अनिल वाघमारे यांच्या मार्गदर्शनाखाली डिजिटल मीडिया परिषदेचे जिल्हाध्यक्ष दिनकर शिंदे यांनी दिनांक ३ मार्च २०२५ रोजी डिजिटल मीडियाची बीड तालुका कार्यकारणी पुढील दोन वर्षासाठी जाहीर केली आहे. यात तालुकाध्यक्षपदी- अभिजीत पवार, कार्याध्यक्ष- लक्ष्मण गायकवाड, उपाध्यक्ष- दीपक वाघमारे, सचिव- शेख समसाद तर संघटकपदी- अरबाज आतार खाजामिया यांचा समावेश आहे.

बीड तालुक्यात यूट्यूब चैनल, इंस्टाग्राम, फेसबुक, ब्लॉग, व्हाट्सअप, ऑनलाइन दैनिक यासह वेगवेगळ्या डिजिटल मीडियाच्या माध्यमातून शेकडो पत्रकार काम करत आहेत. त्यांना संघटित करून योग्य दिशेने आणि सुसूत्र पद्धतीने डिजिटल मीडियाचे काम व्हावे. त्यासोबतच या क्षेत्रात काम करणाऱ्या प्रत्येक पत्रकाराला सुरक्षा देऊन त्यांचे प्रश्न मार्गी लावण्यासाठी डिजिटल मीडिया परिषद काम करत आहे. यासाठी बीड तालुका कार्यकारणी जाहीर करण्यात आली असून पदाधिकाऱ्यांनी जास्तीत जास्त सदस्य नोंदणी करावी असे आवाहन डिजिटल मीडिया परिषदेचे जिल्हाध्यक्ष दिनकर शिंदे यांनी करून नूतन पदाधिकाऱ्यांचे अभिनंदन केले आहे.

बाबुरावजी आडसकर महाविद्यालयात संविधान गौरव महोत्सवानिमित्त प्रश्नमंजुषा स्पर्धा

केज । प्रतिनिधी

केज येथील बाबुरावजी आडसकर महाविद्यालय, केज येथे संविधान गौरव महोत्सव २०२५ अंतर्गत प्रश्नमंजुषा स्पर्धा घेण्यात आली. विद्यार्थ्यांमध्ये भारतीय संविधानाविषयी जागरूकता निर्माण करण्यासाठी उपक्रम राबविण्यात आला. महाविद्यालयातील सर्व विद्यार्थ्यांसाठी प्रश्नमंजुषा खुली होती .

स्पर्धेतील सर्व प्रश्न बहुपर्यायी स्वरूपाचे होते. विद्यार्थ्यांना संविधान, त्याचा इतिहास, मूलभूत अधिकार, कर्तव्ये आणि भारताच्या लोकशाही व्यवस्थेशी संबंधित प्रश्न विचारण्यात आले. स्पर्धेच्या माध्यमातून संविधानाविषयी मूलभूत माहिती विद्यार्थ्यांना मिळाली स्पर्धेमध्ये विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला आणि आपल्या ज्ञानाची परीक्षा पाहण्याची संधी साधली. प्रश्नमंजुषेतील सर्वोत्तम कामगिरी करणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रथम, द्वितीय आणि तृतीय क्रमांकाचे बक्षिसे प्रदान करण्यात येणार आहे. तसेच, सर्व सहभागी विद्यार्थ्यांना सहभाग प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात आले. संविधान हा आपल्या देशाचा आधारस्तंभ आहे. त्याचे योग्य आकलन आणि पालन करणे प्रत्येक नागरिकाचे कर्तव्य आहे. अशा प्रकारच्या प्रश्नमंजुषा स्पर्धांमुळे संविधानाविषयीची माहिती विद्यार्थ्यांपर्यंत सहज आणि रोचक पद्धतीने पोहोच करण्यात आली या आयोजन करून संविधान जागरूकता वाढवण्याचा महाविद्यालयाचा मानस आहे. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. फावडे एम. जी. यांनी मार्गदर्शन केले.

अमरसिंह पंडित साहेबांना विधान परिषदेवर संधी द्यावी : सरपंच शितल साखरे

गेवराई । प्रतिनिधी

बीड जिल्ह्यामध्ये एक अभ्यासू नेतृत्व म्हणून अमरसिंह पंडित यांच्याकडे पाहिले जाते सदैव तळागाळातील जनतेसोबत जोडली गेलेली नाळ ही त्यांनी कधीच तुटू दिली नाही. लोकांच्या सुख दुःखात सदैव सहभागी राहिलेले आहेत. अशा नेतृत्वाला विधानपरिषदेवर संधी द्यावी अशी मागणी धोंडराईच्या लोकप्रिय सरपंच शितल साखरे यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे केली आहे. शारदा प्रतिष्ठानच्या वतीने सतत काम करत आलेले आहे. विवाह सोहळा, आदर्श शिक्षक पुरस्कार, कोवीड काळामध्ये चालू केलेले सेंटर लोकप्रतिनिधी घरात बसलेले असताना आदरणीय साहेब हे

गोरगरिबांच्या सेवेत होते, प्रश्न मतदारसंघातला असो किंवा सगळ्या बीड जिल्ह्यातला असो अडचण किंवा काम घेऊन साहेबांकडे गेला आणि तो रिकाम्या हाताने परत आला नाही. प्रत्येकाच्या सुखदुःखामध्ये साहेबांनी सहभाग घेतलेला आहे शेतकऱ्याचे प्रश्न असो पाण्याचा प्रश्न असो किंवा आणखी कुठलेही प्रश्न असं प्रत्येक गोष्टींमध्ये आदरणीय भैय्यासाहेब हे अग्रेसर असतात म्हणून अशी व्यक्ती विधानभवनामध्ये आवाज उठवण्यासाठी आवश्यक आहे. शेतकरी जेव्हा जेव्हा संकटात असतो तेव्हा आदरणीय भैय्यासाहेबांनी एक पाऊल पुढे टाकलेले आहे म्हणून त्यांना विधान परिषदेवर घेऊन जनसेवेची संधी देण्यात ही सामान्य कार्यकर्त्यांची भावना आहे.

जाहीर प्रगटन

मी, समृत जाधव, जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी, तथा जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, बीड खालील संघीय संस्थांच्या समिती सदस्यांच्या सन २०२५-२०२६ ते २०३०-२०३१ या कालावधीसाठीच्या होणाऱ्या निवडणूक घेणेबाबत मा. सचिव, राज्य सहकारी निवडणूक प्राधिकरण महाराष्ट्र राज्य पुणे यांनी ठरवुन दिलेल्या दि. ०१/०१/२०२५ या अर्हता दिनांकावर पात्र सभासद संस्थांच्या प्रतिनिधीचे ठराव नामनिर्देशन पत्र दाखल करणे, सूचविणे, अनुमोदन देणे व मतदान करणे या साठी मागविण्यात येत आहे.

अ.क्र	संघीय संस्थेचे नाव	ठराव दाखल करण्याचा कालावधी	वेळ	ठराव दाखल करण्याचे ठिकाण
१	आष्टी तालुका सहकारी खरेदी- विक्री संस्था, म. आष्टी, जि.बीड	दि.०६.०३.२०२५ ते दि. ०४.०४.२०२५	सकाळी ११.०० ते दुपारी ०३.००	सहायक निबंधक, सहकारी संस्था, ता. आष्टी, जि.बीड

इतर सविस्तर सूचना संबधीत तालुक्याचे **सहायक निबंधक, सहकारी संस्था, ता. आष्टी, जि.बीड** यांचे कार्यालयात पहावयास मिळतील.

दि. ०६.०३.२०२५

स्थळ : बीड

स्वाक्षरीत
(समृत जाधव)
जिल्हा सहकारी निवडणूक अधिकारी
तथा
जिल्हा उपनिबंधक, सहकारी संस्था, बीड

जाहीर प्रगटन

मा. श्री. के. आर. जोगळेकर, जिल्हा न्यायाधीश - ४, बीड यांचे न्यायालयात

किरकोळ दिवाणी अर्ज क्र. : ८७/२०२५

अर्जदार - शिवकन्या मंजाराम काकडे, वय ४४ वर्षे, धंदा शेती व घरकाम रा. टाकळगव्हाण तरफ तालखेड, ता. गेवराई, जि. बीड

विरूध्द

गैरअर्जदार- महाराष्ट्र शासन मार्फत सरकारी वकील, बीड

अर्जदारातर्फे वकिल - ॲड. के.आर.गवळी, बीड.

मागणी- अज्ञानाचे नावे असलेली मालमत्ता हस्तांतरण / विक्री करण्याची परवानगी मिळणे बाबत.

ज्याअर्थी अर्जदार शिवकन्या मंजाराम काकडे, वय ४४ वर्षे, धंदा शेती व घरकाम टाकळगव्हाण तरफ तालखेड, ता. गेवराई, जि. बीड यांनी या न्यायालयात असा अर्ज दिला आहे की, अर्जदाराची अज्ञान मुलगा नामे अविनाश मंजाराम काकडे, वय १६ वर्षे हा अज्ञान असुन अर्जदार ही अज्ञान मुलगा नामे अविनाश मंजाराम काकडे याची आई असुन अज्ञानाची पालनकर्ती आहे. अज्ञानाचे नावे टाकळगव्हाण तरफ तालखेड ता. गेवराई, जि. बीड हाददीतील गट नं. ५८/इ मधील ०.२६ हे. आर जमीन अज्ञानाचे नावे असलेली सदर मिळकत विक्री/हस्तांतरण करण्याची परवानगी मिळणे बाबतचा अर्ज दाखल केला आहे.

ज्याअर्थी कोणास यासंबंधी आक्षेप असेल तर त्यांनी सदरील प्रगटन प्रसिध्दीपासून (३०) तीस दिवसांच्या आत या न्यायालया समोर स्वतः किंवा वकिलामार्फत हजर रहावे, अन्यथा अर्जाची सुनावणी होवून नियमाप्रमाणे आदेश दिला जाईल.

ज्याअर्थी कोणास यासंबंधी आक्षेप असेल तर त्यांनी सदरील प्रगटन प्रसिध्दीपासून (३०) तीस दिवसांच्या आत या न्यायालया समोर स्वतः किंवा वकिलामार्फत हजर रहावे, अन्यथा अर्जाची सुनावणी होवून नियमाप्रमाणे आदेश दिला जाईल. आज दिनांक २८/०२/२०२५ रोजी माझे सहिने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

प्रकरणातील पुढील तारीख : ०९/०४/२०२५

आदेशावरून.
(स्वाक्षरीत)
सहा. अधीक्षक
जिल्हा न्यायालय,बीड

(स्वाक्षरीत)
लिपीक

शिक्का

जाहीर प्रगटन

श्री. आर. आर. जाधव ४ थे सह दिवाणी न्यायाधीश क. स्तर, गेवराई, गेवराई, जि.बीड यांचे न्यायालयात

दिवाणी किरकोळ अर्ज क. २०७/२०२५, हरीभाऊ व ईतर २ वि. निरंक

ज्याअर्थी मयत नामे **कुसुम भ्र. हरिभाउ शरणागत, रा. मौजे रामपुरी, ता. गेवराई, जि. बीड या दिनांक २५/१०/२०२० मौजे रामपुरी, ता. गेवराई, जि. बीड** येथे मयत झाल्या.

अर्जदार :- १) हरिभाउ पि. सखाराम शरणागत, वय ६८, धंदा शेती, रा. रामपुरी, ता. गेवराई, जि. बीड. २) संजय पि.हरिभाउ शरणागत, वय ४२, धंदा शेती, रा. रामपुरी, ता. गेवराई, जि.बीड ३) धम्मपाल पि. हरिभाऊ शरणागत, वय ४०, धंदा शेती, रा. रामपुरी, ता. गेवराई, जि. बीड.

ज्याअर्थी अर्जदार यांना शासकिय व निमशासकिय कामासाठी कायदेशीर वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे करीता मुंबई रेग्युलेशन ॲक्टचे कलम २ प्रमाणे वारसाचे प्रमाणपत्र मिळावे असा अर्ज त्यांनी या न्यायालयाकडे केला आहे.

त्यापेक्षा सदर अर्जदार हे सदरहू मयताचे कायदेशीर वारस नव्हेत असे कोणाचे म्हणणे असेल तर, या घोषणेच्या दिनांकापासून तीस दिवसांचे आत त्याने या न्यायालयात हजर होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुण असेही कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्यास सदर न्यायालय सदर अर्जदारांच्या हक्कावरून लागलीच पुरावा सेवन त्याचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदार यांना सदर मयत नामे **कुसुम भ्र. हरिभाउ शरणागत**, रा. मौजे रामपुरी, ता. गेवराई, जि. बीड यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल. आज दिनाक ०५/०३/२०२५ माझ्या सही व शिक्यानिशी दिले.

पुढील तारीख १६/०४/२०२५
(मार्फत ॲड.डी.डी.मस्के, गेवराई)

आदेशावरून.
(स्वाक्षरीत)
सहा. अधीक्षक
दिवाणी न्यायालय,क.स्तर, गेवराई

(स्वाक्षरीत)
क.लिपीक

शिक्का

वारस प्रमाणपत्रा बद्दल जाहीर घोषणा

गेवराई, जि.बीड येथील दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर श्री. एस. पी. वानखडे यांचे न्यायालयात

किरकोळ दिवाणी अर्ज क्रमांक २०८/२०२५

शांताबाई भ्र. लक्ष्मण शरणागत वगैरे विरूध्द निरंक

ज्याअर्थी मयत नामे **लक्ष्मण पि. नबाजी शरणागत** हे हया दिनांक १६/१०/२०२२ रोजी मौजे रामपुरी, ता. गेवराई, जि. बीड, येथे मयत झाले/झाल्या आहेत. अर्जदार क. १. शांताबाई भ्र लक्ष्मण शरणागत, वय ६५ वर्षे, धंदा- घरकाम, रा. रामपुरी, ता. गेवराई जि. बीड, २ काकासाहेब पि. लक्ष्मण शरणागत, वय ४१ वर्षे, धंदा शेती, रा. रामपुरी, ता. गेवराई जि. बीड ३. योगीराज पि. लक्ष्मण शरणागत, वय ३५ वर्षे, धंदा शेती, रा. रामपुरी, ता. गेवराई जि बीड, यांनी शासकीय/निमशासकीय कामकाजासाठी कायदेशीर वारस प्रमाणपत्राची आवश्यकत आहे. करीता मुंबई रेग्युलेशन ॲक्टचे कलम २ प्रमाणे वारसाचे प्रमाणपत्र मिळावे असा अज त्यांनी या न्यायालयाकडे केला आहे.

त्यापेक्षा सदर अर्जदार हे सदरहू मयताचे कायदेशीर वारस नव्हेत असे कोणाने म्हणणे असेल तर, या घोषणेच्या दिनांकापासुन तीस दिवसाचे आत त्याने या न्यायालयात हज होवून आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरुन असेही कळविण्यात येते की जर दाखविल्यास सदर न्यायालय सन्दर अर्जदाराख्या सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न हक्कावरुन लागलीच पुरावा घेवुन त्याचा हक्क शाबीत दिसल्यास अर्जदार यांना सदर मत लक्ष्मण पि. नबाजी शरणागत यांचे वारसाचे प्रमाणपत्र देण्यात येईल.

आज दिनांक ०४/०३/२०२५ रोजी माझ्या स्वाक्षरीनिशी व न्यायालयीन शिक्यानिशी दिले. पुढील तारीख - ०७/०४/२०२५

(मार्फत ॲड. डी. डी. मस्के गेवराई)

आदेशावरून.
(स्वाक्षरीत)
सहा. अधीक्षक
दिवाणी न्यायालय, क.स्तर, गेवराई

(स्वाक्षरीत)
क.लिपीक

शिक्का

शिवसेना जिल्हाप्रमुख परमेश्वर सातपुते यांनी आष्टी मतदारसंघात शिवसेना पक्ष संघटना मजबूत केली

• जिल्हा संपर्कप्रमुख प्रमुख परशुरामजी जाधव

आष्टी । प्रतिनिधी

शिवसेना पक्षप्रमुख उद्धवजी ठाकरे यांच्या आदेशाने व युवा सेना प्रमुख आदित्यजी ठाकरे , शिवसेना नेते तथा शिवसेना सचिव विनायकजी राऊत, शिवसेना मराठवाडा संपर्क नेते सुनील प्रभू ,मराठवाडा सम न्वयक विश्वनाथजी नेरूरकर यांच्या मार्गदर्शनाखाली,शिवसेना बीड जिल्हा संपर्कप्रमुख परशुरामजी जाधव यांच्या अध्यक्षतेखाली व शिवसेना जिल्हाप्रमुख परमेश्वर सातपुते सर यांच्या नेतृत्वाखाली बुधवार दिनांक ०५ मार्च रोजी पाटोदा शहरातील शासकीय विश्रामगृह येथे आष्टी विधानसभा मतदारसंघातील आष्टी, पाटोदा,शिरूर तीनही तालुक्यातील शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाच्या प्रमुख पदाधिकाऱ्यांची म हत्त्वपूर्ण बैठक पार पडली.

यावेळी संपर्क प्रमुख परशुरामजी जाधव व शिवसेना जिल्हाप्रमुख परमेश्वर सातपुते यांनी सर्व पदाधिकाऱ्यांशी संवाद साधत प्रत्येक तालुक्यात कार्यक्षेत्रात चालू असलेल्या कार्याचा आढावा घेतला. सर्व पदाधिकाऱ्यांनी एकत्र येऊन पक्ष संघटन वाढीसाठी तन-मन धनाने काम करावे. गावोगावी शाखा कराव्यात असे आवाहन केले.

व झालेल्या विधानसभा निवडणुकीतील पराभवानंतर खचून न जाता येणाऱ्या स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका लक्षात घेऊन जोमाने कामाला लागावे असे प्रतिपादन केले.

यावेळी महिला आघाडीच्या जिल्हा संघटिका प्रमिलाताई म ाळी, जिल्हा संघटक रतन तात्या गुजर,उपजिल्हाप्रमुख आजिनाथजी खेडकर, पाटोदा तालुका प्रमुख मुकूंदजी शिंदे, आष्टी तालुका प्रमुख सुभाषजी राऊत, शिरूर तालुका प्रमुख सोपान काका मोरे, महिला आघाडी पाटोदा तालुका प्रमुख प्रतिभाताई वनवे,युवासेना उपजिल्हा युवाधिकारी कृष्णाजी चौरे, युवासेना शिरूर तालुका युवाधिकारी साईनाथजी ढाकणे, युवासेना आष्टी तालुका युवाधिकारी शिवप्रसादजी जाधव, युवासेना पाटोदा तालुका युवाधिकारी अजिंक्यजी डोरले, शिवसेना उपतालुकाप्रमुख अक्षयजी साप्ते,आष्टी तालुका संघटक ज्ञानदेवजी मुटकुळे, शेतकरी सेनेचे तालुकाप्रमुख बिभिसेनजी बिसेन, युवा नेते आकाशजी कांकरिया, युवा नेते सोमनाथजी लवुळ सह शिवसेना, युवासेना, महिला आघाडचे सर्व पदाधिकारी उपस्थित होते.

सरपंच/ सदस्य यांना अपात्र केलेला जिल्हाधिकारी यांचा आदेश रद्द करावा

प्रा.ईश्वर मुंडे यांची आ.जयंत पाटील यांच्याकडे मागणी

मुंबई । प्रतिनिधी

मागील दोन वर्षांपूर्वी जनतेतून निवडून आलेले राखीव प्रवर्गातील सरपंच व सदस्य यांनी आपले जात वैद्यता प्रमाणपत्र वेळेत सादर केले नाहीत या कारणास्तव श्री अविनाश पाठक,जिल्हाधिकारी बीड यांनी दि.२०/१२/२०२४ रोजी जिल्ह्यातील सरपंच व सदस्य यांना अपात्र केले.

या मध्ये अनेकांनी आपले जात वैद्यता प्रमाणपत्र विहीत म ुदतीत सादर केलेले आहे.कांहीचे प्रमाणपत्र मिळाले पण उशीर झाला म्हणून दाखल करून घेतले नाही. अशा कांही चुका जिल्हाधिकारी, बीड कार्यालयाने केल्या आहेत.नैसर्गिक न्यायाच्या नियम ाने संबंधितांना एखादी अंतीम नोटीस देणे अपेक्षीत असते.असे न करता अपात्र ठरवण्याचे आदेश काढणे बेकायदेशीर आहे.अशी कारवाई फक्त बीड जिल्ह्यातच केलेली आहे. तरी विधान सभा अधिवेशनात तारांकीत प्रश्न उपस्थीत करून जिल्हाधिकारी बीड ▶▶ उर्वरित पान २ वर

अनुसूचित जाती जमातीच्या सुशिक्षित बेरोजगार युवक युवतींसाठी उद्योजकता विकास प्रशिक्षण

बीड । प्रतिनिधी

भारतरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती नव उद्योजकांसाठी विशेष सामूहिक प्रोत्साहन योजनेअंतर्गत सन २०२४-२५ करिता निवासी उद्योजकता विकास प्रशिक्षण कार्यक्रम अंतर्गत मराठवाडा विभागामध्ये ३२० नव उद्योजकांना निवासी उद्योजकता विकास प्रशिक्षण कार्यक्रम(ठएउझ) व तांत्रिक उद्योजकता विकास प्रशिक्षण कार्यक्रम (ठढएउझ) प्रशिक्षण कार्यक्रमाचे आयोजन विभागीय स्तरावर छत्रपती संभाजीनगर या ठिकाणी करण्यात आले आहे. सदरील प्रशिक्षण कार्यक्रमांमध्ये उद्योग संधी, उद्योगाची निवड, उद्योगाचे व्यवस्थापन, लघुउद्योग, सेवा उद्योग, व्यापार उद्योग उद्योगातील विविध टप्पे, उद्योजकीय गुणसंपदा, उद्योगाची जाहिरात, मार्केटिंग, संवाद कौशल्य, प्रकल्प अहवाल, शासकीय कर्ज व अनुदान विषयक योजनांची माहिती, प्रत्यक्ष उद्योगांना भेटी, यशस्वी उद्योजकाचे मार्गदर्शन, उद्योगासाठी लागणारे परवाने, लायसन्स ,इत्यादी विषयावर निवासी उद्योजकता विकास प्रशिक्षण कार्यक्रमांमध्ये मार्गदर्शन करण्यात येणार असून सदरील प्रशिक्षण कार्यक्रम हा दिनांक १० मार्च २०२५ ते २४ मार्च २०२५ या कालावधी दरम्यान महाराष्ट्र उद्योजकता विकास केंद्र मुख्य कार्यालय छत्रपती संभाजी नगर या ▶▶ उर्वरित पान २ वर

बीड- ८ मार्च जागतिक महिला दिनानिमित्त सप्ताहाचे आयोजन

बीड । प्रतिनिधी

जिल्हा रुग्णालयात जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. अशोक थोरात, मेट्रन रमा गिरी यांच्या मार्गदर्शनात आनंद नगरी घेण्यात आली. यावेळी जिल्हा रुग्णालयातील वेगवेगळ्या विभागातील महिला कर्मचाऱ्यांनी उत्कृष्ट व स्वादिष्ट खाद्यपदार्थ ३० पेक्षा जास्त स्टॉल खाण्यासाठी ठेवले होते. यामध्ये सर्वच कर्मचाऱ्यांनी खाद्यपदार्थाचा आस्वाद घेतला. यावेळी जिल्हा शल्य चिकित्सक डॉ, अशोक थोरात, आरएमओ डॉ. संतोष शहाणे, मेट्रन रमा गिरी यांच्यासह सर्व कर्मचारी महिला पदाधिकारी यांची उपस्थिती होती.

मराठा सेवा संघाची केज येथे बैठक ; विविध पदाधिकारी कार्यकारिणी जाहीर

केज । प्रतिनिधी

मराठा सेवा संघाची बैठक केज येथे सोमवार रोजी संपन्न झाली. बैठकीचे अध्यक्ष मराठा सेवा संघाचे जिल्हाध्यक्ष नागनाथ जाधव होते. यावेळी विविध पदाधिकाऱ्यांची नवीन कार्यकारिणी जाहीर करण्यात आली.

मराठा सेवा संघाचे जिल्हाध्यक्ष शिवश्री नागनाथ जाधव जगद्गुरु तुकोबाराय साहित्य परिषदेचे विष्णू तपसे, हनुमंत घाडगे हनुमंत भोसले, गोविंद सपाटे, राधाताई सपकाळ,हिराबाई शेळके ,गोविंद शिनगारे आदींची उपस्थिती होती. येणाऱ्या कालावधीत होणारी जिजाऊ प्रबोधन यात्रा विषयी चर्चा करुन या प्रबोधन यात्रेचे विविध ठिकाणी तालुक्यामध्ये विविध प्रकारे स्वागत, कार्यक्रम घेण्याचे निश्चित करण्यात आले. मराठा सेवा संघ शिवधर्म संस्कार विधी नामदेव तुकोबा विचार कृती प्रणित, क्रांतीसिंह नाना पाटील शिवसेवक जिल्हाध्यक्ष बीड पूर्व साठी योगेश्वर महाराज आंबाड यांची निवड करण्यात आली, किशोर भालेराव यांची तालुका उपाध्यक्ष पदी निवड करण्यात आली. अश्विन टोंपे यांची तालुका उपाध्यक्ष तर तालुका सचिव विष्णू यादव, तालुका कोषाध्यक्ष धनराज इंगोले, तालुका कार्याध्यक्ष शशिकांत जाधव,तालुका संघटक तुषार पाटील, मनोज भोसले केज शहराध्यक्ष, संतोष काका जगदाळे-सदस्य पदी निवड करण्यात आली .याप्रसंगी नूतन पदाधिकाऱ्यांचे पुष्पगुच्छ पुस्तक ▶▶ उर्वरित पान २ वर

चिंचोटी रस्त्यावरील खड्ड्यात शुक्रवारी जागरण गोंधळाचा कार्यक्रम

तहसीलदार आणि बांधकाम विभागाला कार्यक्रमाचे निमंत्रण

या रस्त्यावरील अनेक गावातील नागरिकांनी उपस्थित राहावे- चिंचोटी वडवणी रस्त्यावरून प्रवास करणाऱ्या चिंचोटी राजा हरिश्चंद्र पिंपरी चिंचवडगाव काडीवडगाव देवडी देवगाव या ठिकाणच्या नागरिकांनी या जागरण गोंधळासाठी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे नामांकित गोंधळी मंडळी या ठिकाणी बोलवण्यात आले आहेत अशी माहिती विनोद काकडे यांनी दिली.

वडवणी । प्रतिनिधी

वडवणी ते चिंचोटी रस्त्यावरील मोठमोठ्या पडलेल्या खड्ड्यात येत्या शुक्रवार दिनांक सात मार्च रोजी सकाळी साडेदहा वाजता भव्य दिव्य जागरण गोंधळाचा कार्यक्रम आयोजित केला आहे. या कार्यक्रमासाठी वडवणीचे तहसीलदार तसेच बांधकाम विभागाच्या कर्तव्यदक्ष अधिकाऱ्यांनी मोठ्या प्रमाणात उपस्थित राहावे असे आवाहन वंचित बहुजन युवा आघाडीचे वडवणी ▶▶ उर्वरित पान २ वर

महिला मुलींचे बाईक रॅलीच्या आयोजन

बीड । प्रतिनिधी

केंद्र सरकारच्या बेटी बचाव, बेटी पढाव या योजनेला २०२५ मध्ये दहा वर्षे पूर्ण झाले, असून त्या निमित्ताने बीड जिल्हा पोलीस दलातर्फे बेटी बचाव,बेटी पढाव या अभियानांतर्गत महिला पोलिस अंमलदार, अधिकारी तसेच महिला मुलीं यांचे बाईक रॅलीचे आयोजन करण्यात आले आहे, ०७ मार्च २०२५ रोजी सकाळी ०६.३० छत्रपती संभाजी महाराज क्रीडांगण, शिवाजी महाराज चौक येथे जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक नवनीत कावत हे रॅलीला हिरवी झेंडी दाखवून सुरुवात करतील. व या रॅली चां शेवट पोलीस मुख्यालय बीड येथे होईल

नियम . स्वतःची दुचाकी(बुलेट स्कूटी मोटरसायकल)घेऊन येणे,हेल्मेट आणणे बंधनकारक, कोणतही पांढरा पोशाख (कुर्ती ,शर्ट, पंजाबी, सारी), फक्त म हिला व मुलीच रॅली मध्ये सहभागी होतील. मोठ्या संख्येने महिला विशेष करून विद्यार्थिनी यांनी रॅलीमध्ये सहभाग घ्यावा यासाठी बीड जिल्हा पोलीस दलातर्फे आवाहन करण्यात येत आहे.

बीड पंचायत समितीच्या वतीने लिंबागणेश येथे 'एक दिवस गावक-यांसोबत'

शासनाच्या कल्याणकारी योजनांचा लाभ घ्यावा : जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी डॉ.विजय देशमुख यांचे आवाहन

ग्राम दरबार उपक्रमास उत्स्फूर्त प्रतिसाद

केज । प्रतिनिधी

लिंबागणेश:- (दि.०५)बीड पंचायत समितीच्या व ग्रामपंचायत लिंबागणेश यांच्या संयुक्त विद्यमाने आज दि.(०५) बुधवार रोजी लिंबागणेश येथे 'एक दिवस गावकऱ्यांसोबत ' ग्राम दरबार उपक्रम अंतर्गत घेण्यात आला.यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी जिल्हा परिषद बीड डॉ.विजय देशमुख तर प्रमुख उपस्थिती म्हणून पशुवैद्यकीय अधिकारी लिंबागणेश डॉ.रमण देशपांडे, पशुवैद्यकीय अधिकारी डॉ.सुनिल यादव, विस्तार अधिकारी पंचायत समिती बीड येळंबकर, कृषी विस्तार अधिकारी चंद्रकांत नागरगोजे, कृषी सहायक वाघ,पेजगुडे,उमेद अभियानच्या प्रियंका जोगदंड, ज्योत्स्ना वखरे, आरोग्य सेवक वीर यांची उपस्थिती होती. ग्रामपंचायतच्या वतीने सरपंच बालासाहेब जाधव, ग्रामविकास अधिकारी वीर , सेवा सोसायटी चेअरमन रविंद्र निर्मळ आणि ग्रामपंचायत सदस्यांनी पुष्पगुच्छ देऊन मान्यवरांचे स्वागत केले.कार्यक्रमाचे सुत्रसंचलन ग्रामविकास अधिकारी श्रीराम वीर यांनी केले तर डॉ. गणेश ढवळे यांनी आभार मानले. यावेळी ग्रामपंचायत सदस्य श्रीहरी निर्मळ, दामोदर थोरात, रमेश गायकवाड, समीर शेख, दादा गायकवाड, अँड.गणेश वाणी, सुरेश निर्मळ, सय्यद शाकेर, माणिक कांबळे,जीवन मुळे, सुखदेव वाणी, हरिओम क्षीरसागर आदि ग्रामस्थांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. भारतातील ६२ टक्के लोकसंख्या आजही ग्रामीण भागात राहते. ग्रामीण भागातील पुनरुत्थानासाठी शासनामार्फत ▶▶ उर्वरित पान २ वर

चिंचोटी येथे वाल्मीक कराड यांच्या पोस्टरला जोडे मारो आंदोलन

वडवणी । प्रतिनिधी

मस्साजोगचे सरपंच स्व संतोष देशमुख यांची निघृनपणे खून करण्यात आला होता.त्यांना भयानक मारहान करतानांचे व्हीडीओ फोटो आरोपींनी काडले होते. तर आरोपीला अटक करुन सीआयडी आणि एसआयटीने तपास पुर्ण करुन दोषपत्र देखील न्यायलायात दाखल केले आहे. खूनाचे फोटो सध्या सोशिअल मिडियावर व्हायरल झाले आहेत. सदरील फोटो पाहून मानवी जीवन हळहळले आहेत. हे कृत पाहून सर्वत्र संताप व्यक्त केला जात आहे.याचा निषेध म्हणुन तालुक्यातील चिंचोटी येथे म ास्टरमाईंड वाल्मीक कराड यांच्या पोस्टरला जोडे मारो आंदोलन करत पोस्टर जाळण्यात आले.

स्व संतोष देशमुख यांचा ज्या प्रमाणे खुन केला.त्यांचे फोटो पाहुन प्रत्येकाच्या डोक्यात पाणी आल्याशिवाय राहात नाही आशा प्रकारची क्रुर हत्या कोणालाही न पाहावनारी नाही.त्यांच्या म ारेकऱ्यांना फाशी नाही तर ज्या प्रम ाणे संतोष देशमुखला मारले तशाच प्रकारे त्यांना भर चौकात मारावे आसे पृत्येकाच्या तोडांतुन शब्द निघत आहेत.त्या मारेकऱ्यांचा निषेध करण्यासाठी मंगळवार दि ४ रोजी वडवणी शहरासह ग्रामीण भागातही त्याचा पडसाद उमटत आहेत.वडवणी तालुक्यातील चिंचोटी येथे सर्व गावकऱ्यांनी मि ळुन स्व संतोष देशमुख मारेकर्याचा मास्टर माईंड वाल्मीक कराड याच्या पुतळ्याला जोडे मारो आंदोलन करत त्याच्या पोस्टरचे पेटऊन देऊन दहन करण्यात आले ▶▶ उर्वरित पान २ वर